# B.Com. Part–I (Semester–II) Examination

## (Optional Languages)

## MARATHI

Time : Three Hours] [Maximum Marks : 80

**सूचना :—सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक.

139

1. स्वातंत्र्याची व्याख्या सांगून स्वातंत्र्याची महत्ता तुमच्या शब्दात स्पष्ट करून सांगा. 10

**किंवा**

'मीतीय आहे !' या पाठाच्या आधारे शिक्षणाचे महत्व स्पष्ट करा.

2. मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या व्यक्तिमत्वाचा परिचय घडवा. 6

**किंवा**

आजच्या युगाचे कोणते मागणे प्रल्हाद भुलेकर यांनी अधोरेखित केले आहे?

3. अवधूतचा शैक्षणिक संघर्ष रेखाटा. 10

**किंवा**

'दिंडी गेली पुढे !' या पाठाच्या आधारे जीवनाचे मर्म उलगडून दाखवा.

4. 'गोदो' या ललित लेखाचे आशयसूत्र स्पष्ट करा. 6

**किंवा**

शेठ-सावकारांकडून होणाऱ्या शेतकऱ्यांच्या महालुटीचे चित्रण तुमच्या शब्दात लिहा.

5. 'माय' कवितेचा आशय स्पष्ट करा. 10

**किंवा**

'कबीर' या आत्मचिंतन पर कवितेत समाजव्यवस्थे विरूद्धचा संताप व चीड कशी व्यक्त झाली ते सांगा.

6. सभावेतालच्या अत्यंत विपरीत स्थितीचे भान 'अध्याप' या कवितेत कसे व्यक्त झाले आहे, स्पष्ट करा. 6

**किंवा**

'जखम' या कवितेचा आशय स्पष्ट करा.

7. कार्यालयीन पत्रव्यवहाराचे महत्व सांगून त्याचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये विशद करा. 10

**किंवा**

मागणी पत्र म्हणजे काय हे सांगून मागणी पत्राचा नमुना तयार करा.

8. खालील उतारा वाचून त्याचा आशय लिहा : 6

लोकांणी आपल्या वर्तणातून आपल्या प्रदेशात संस्कृती निर्माण केलेली असते. त्याचा परिणाम माणसाच्या जाणीवांच्या विकसनावर होत असतो त्यातून येणारे साहित्य संस्कृतीची जोपासनावतर करतेच; पण तिचे संवर्धनही करीत असते. प्रत्येक मानवी समूहाचे आणि उपसमूहाचे आचार विचार रीती रिवाज, नीती-अनीतीच्या कल्पना भिन्न असतात असे असले तरी एकूण मानवी संस्कृतीशी त्यांचे नाते असते. हेच साहित्याच्या संदर्भात आहे. ग्रामीण साहित्यातून त्या त्या ग्रामव्यवस्थेचे, प्रदेशाचे तेथील लोकसंस्कृतीचे कृषिसंस्कृतीचे चित्रण येते पण एकूण मानवी संस्कृतीतून निर्माण होणाऱ्या साहित्याशी त्याचे नाते असतेच.

ग्रामीण परिसराचे वेगळेपण भौगोलिक पर्यावरणाने सिद्ध केलेले असते त्या त्या प्रदेशातील डोंगर दऱ्या, नद्या, नाले, यातून निर्माण झालेला सुपीक किंवा वाळवंटी भूभाग त्या त्या संस्कृतीवर परिणामकारक ठरतो. त्या प्रदेशातील विहिरी त्यातून लाभलेली आर्थिक स्थिती यातून संस्कृती आकार घेते त्या संस्कृतीच्या जाणीवातून साहित्य निर्मिती होते. पावसाचे ऋतुमानाचे वैविध्य संस्कृतीमध्येही निर्माण करीत असते. साधारण पावसात ज्वारी, कापूस अधिक पावसात तांदूळ पीक अधिक घेतले जाणार हे स्पष्ट आहे.

त्यातूनच त्यांची समृद्धी येत असते अधिक समृद्धी अधिक आधुनिकता आणत असते, प्राप्त करुन देत असते. याचा साहित्याच्या निर्मितीवर परिणाम होत असता साहित्यातील चित्रण तेथील जीवनानुभव व्यक्त करीत असते.

डॉ. प्रल्हाद भुलेकर

**किंवा**

खाली दिलेल्या इग्रजी भाषेतील उताऱ्याचे मराठी भाषेत भाषांतर करा :

Always remembring our future plans and bringing them in reality means following the true religion. You may work in fields, factories, hospitals or schools, working devotedly means following the religion. You proclaim your religion through your deeds not through your words, sermons or religious books.

9. (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा :

(1) एरिक फ्राम यांनी कोणता ग्रंथ लिहिला ? 1

(2) ४९ व्या अ.भा. साहित्य संमेलनात उद्घाटक म्हणून कोण होते ? 1

(3) लोकशाहीतील विसंवाद कोणत्या कविच्या कवितेतून चित्रीत झाला ? 1

(4) कुराणातील 'इक्रा' या शब्दाचा अर्थ काय ? 1

(ब) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा :

(1) तर्काला पटणाऱ्या बोलण्याचा .................. स्वतःवर परिणाम होऊ दिला नाही. 1

(1) आईने

(2) आन्याजीनी

(3) जवरेनी

(2) 'वेटिंग फॉर गोदो' हे .................... यांचे नाटक. 1

(1) शेक्सपिअरचे

(2) वर्डस्वर्थचे

(3) सॅम्युअल बॅकेटचे

(3) पहिल्या पावसात .................. आटोफन हिर्डीत वारकरी सहभागी व्हायचे. 1

(1) पेरणी

(2) निदंण

(3) वखरण

(4) मजुरीयं 'जू' आवकाच्या .................... होतंच : 1

(1) मानेवर

(2) खाद्यावर

(3) पाठीवर

(क) योग्य जोड्या जुडवा : 1+1+1+1

| | |
|---|---|
| (1) अभंग | (अ) अजीम नवाज राही |
| (2) दरवेशी | (ब) नारायण कुलकर्णी कवठेकर |
| (3) अद्याप | (क) वीरा राठोड |
| (4) सावजं | (ड) लोकनाथ यशवंत |
| | (इ) प्रभा गणोरकर |

(ड) वाक्यपूर्ण करून लिहा :

(1) पत्रलेखन हा परस्परातील .................. एक प्रभावी आणि उपयुक्त प्रकार आहे. 1

(2) ................ नसलेले व्यावहारिक उद्दिष्टांसाठी लिहिलेले कोणतेही पत्र अधिकृत मानले जात नाही. 1

(3) चौकशी करताना पत्र लेखकाने आपली भूमिका आणि बाजारातील ..................... या विषयी माहिती देणे आवश्यक असते. 1

(4) तक्रार पत्राची भाषा ...................... असू नये. 1

139 139 139 139 139